# HMM MARATHI SHALA

*"Learn Marathi Playfully"*




नमस्कार मंडळी! वार्षिक कार्यक्रमातून मुलांना एकत्र सहभाग करायची संधी मिळते. त्याबरोबर मुलांना त्यांच्या स्वतःच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळावी म्हणून गेल्या काही वर्षात ह्युस्टन मराठी शाळेने एक नवीन उपक्रम सुरु केला आहे. हा आमचा **"टॅलेंट शो"**! कधी मुलांनी आपल्या संगीत कला, कधी लेखनाच्या कला, कधी मराठी भाषेचे वक्तृत्व दाखवणाऱ्या कला, अश्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून भाग घेतला. आणि त्यांचे कला-ज्ञान बघायची संधी पालकांना, शिक्षकांना आणि त्यांच्या वर्गमित्रांना मिळावी म्हणून हा कार्यक्रम शाळा योजते. ह्या वर्षीही काही मुलांनी लिहिण्याच्या आणि काही मुलांनी बोलण्याच्या स्वरूपात भाग घेतला. त्यातली ही लेखनाची काही चित्रे. मुलांनी स्वतः आपल्या ह्या गोष्टी, ही चित्रे, हे लेख, आणि ह्या कविता लिहिल्या आहेत.

Cypress, Energy Corridor, Inner Loop, Katy आणि Sugar Land ह्या सर्व शाखेतील मुलांचे, त्यांच्या पालकांचे आणि त्यांच्या शिक्षकांचे मनापासून अभिनंदन.

**CYPRESS BRANCH**




Beginner Class - ऐरा पाटील




Beginner Class – सावी अंबुरे




Beginner Class - सना अंबुरे


माझे नाव अथर्व आहे.
मी तेरा वर्षांचा आहे.
मी स्मिथ मीडल स्कूल मधे जातो.
माझा आवडता रंग निळा आहे.
माझ्या बहीणी चे नाव कीशा आहे.
नाव - अथर्व नलावडे
शिक्षकांचे नाव - मनिषा
वय - १३

Beginner Class - अथर्व नलावडे

HMM MARATHI SHALA

"Learn Marathi Playfully"

Pahili Class - जाई कुलकर्णी

भारत भेट 21/12/2021

मी डिसेंबर 2020 हैदराबादला गेले होते. मी माझा वाढदिवस आजी, आबा, काका, मामा, भाऊ आणि बहीण सोबत साजरा केला.

मी राजस्थान, केरळ, पुण्याला गेले. मी तुळजापूरला गेले आणि देवीचे दर्शन घेतले.

मला खूप मजा आली.

मी पुन्हा उन्हाळ्यात भारतात जाईन.

- जाई कुलकर्णी

Pahili Class - अंशुमन बनकर

Name: Anshuman Bankar
Grade: Pahili
Branch: Cypress Marathi Shala
Teacher: Vika Bhalerao

## माझा आवडता खेळ

माझा आवडता खेळ क्रिकेट आहे. हा खेळ बॅट आणि बॉल याने खेळतात. हा खेळ खेळायला अकरा खेळाडूंच्या दोन टीम लागतात. मी वयाच्या सात वर्षापासून हा खेळ खेळतोय. मला बॅटिंग करायला खूप आवडते. हा खेळ भारतात खूप लोकप्रिय आहे. धोनी हा माझा आवडता खेळाडू आहे. मी रोज घराबाहेर क्रिकेट खेळतो. या खेळामुळे मला खूप नविन मित्र मिळाले. क्रिकेट मुळे माझा चांगला व्यायाम होतो.

# HMM MARATHI SHALA

"Learn Marathi Playfully"

## माझी भारत भेट

मी २०१८ ला भारतात गेले होते. मी माझ्या मामाच्या लग्नाला गेले होते. मला तिकडे खूप नातेवाईक भेटले. लग्नात खूप मज्जा केली. हळदीला खूप धमाल केली. मला माझी मामी खूप आवडली. तिने मला भेटवस्तू दिली. त्यादिवशी माझ्या भावाचा वाढदिवस होता. आम्ही केक कापला आणि ओवाळले. नंतर मी गावाला गेले. मी सुंदर मंदीरे पाहीली. मला माझे गाव आवडले. मी मुंबईमध्ये काही ठिकाणे फिरले. मला मुंबईला फिरायला आवडले. अशी माझी आठवणीत राहीलेली भारत भेट झाली.

(इशान्वी लक्ष्मण गावडे)

Pahili Class - इशान्वी गावडे

## भरपूर झाडे का लावावी?

माही घरत

भरपूर झाडे का लावावी? झाडे आपल्याला स्वच्छ हवा देतात. आपल्याला जगण्यासाठी स्वच्छ हवेची गरज असते. झाडे पक्ष्यांचे आणि काही प्राण्यांचे रहाण्याचे ठिकाण असते. झाडे आपल्याला फूले आणि खाण्यासाठी फळे देतात. झाडांमुळे आपल्याला कागद बनवता येतो, जो आपण शाळेत वापरतो. झाडांचे लाकूड घर बांधायला वापरतात. झाडे आपल्याला सावली देतात, गरमीच्या दिवसात सावलीची मदत होते. झाडांची मूळे जमिनीची झीज रोखतात. फुललेली झाडे खूप सुंदर दिसातात आणि आपले जग रंगीत बनवतात, म्हणून आपण भरपूर झाडे लावावी.

Pahili Class - माही घरत

# HMM MARATHI SHALA

"Learn Marathi Playfully"

Pahili Class - रायका घरत

रायका घरत

## पास्ता

माझा आवडता खाऊ पास्ता आहे.

पास्ता वेगवेगळ्या आकारांमध्ये येतो. माझा आवडता पास्ता शंख आकाराचा पास्ता आहे. पास्ता दोन सॉस मध्ये येतो. माझा आवडता सॉस ॲलफ्रेडो आहे. ॲलफ्रेडो सॉस पांढऱ्या रंगाचा असतो. मला ॲलफ्रेडो सॉस आवडतो कारण हा सॉस खूप चविष्ट असतो. मला टॉमेटो सॉस आवडत नाही.

मला पास्ता खूप खूप आवडतो!

## माझा आवडता खेळ

माझा आवडता खेळ टेनिस आहे. टेनिस खेळायला रॅकेट, बॉल, आणि बूट लागतात. टेनिस मध्ये डबल्स किंवा सिंगल्स म्हणजे चार किंवा दोन खेळाडू बरोबर खेळतात. मॅच जिंकायला पाच पैकी तीन सेट जिंकायला लागतात. टेनिस क्ले (माती) कोर्ट, ग्रास (गवत) कोर्ट, किंवा हार्ड कोर्टवर खेळतात. माझा आवडता टेनिस प्लेयर राफाएल नडाल आहे. टेनिस मध्ये ऑस्ट्रेलियन, फ्रेंच, विंबल्डन, आणि यु एस ओपन स्पर्धा सगळ्यात प्रसिद्ध आहेत. मला टेनिस खेळायला आवडते कारण तो खेळ गंमतीचा आणि चढाओढीचा आहे.

Dusari Class - श्रीरंग भालेराव

## आजून झाडे लावा!

जसा काळ जातो, तसेच आपले पृथ्वीवरचे साधने कमी होतात. झाडे मनुष्यांसाठी जिवनावश्यक आहेत, पण जसे आपण वापरतो, तसेच आपल्याला नवीन झाडे लावली पाहिजेत.

झाडे आपल्याला प्राणवायू देतात आणि धोकादायक कार्बन डायॉक्साइड शोषतात. लाकूड आणि कागद, जे आपण खूप वापरतो, झाड्यातून येतात. सफरचंद आणि संत्री झाडांवर उगवतात. झाडे वायू प्रदुषण कमी करतात, आणि झाड्यांवर घरटे असतात. झाडांखाली ऊन असते, म्हणून गरम दिवसात लोक झाडाखाली बसून वाचतात. झाडे निसर्गाचे सौंदर्य आहेत. झाडे सुंदर आहेत, आणि शरद ऋतूत सुंदर रंगी दिसतात.

झाडे वाढवायला वेळ आणि कष्ट लागतात. हे मनासाठी आणि शरीरासाठी चांगल आहे. झाडे पृथ्विवर शंभर लाख वर्ष असलेले आहेत. ते अन्न, वस्तू, आणि निवारा देतात सगळ मातीला धरतात. जर ५ झाडे कापली, तर दहा झाडे लावली पाहिजे आहेत. ते पृथ्विसाठी खूप उपयोगी आणि महत्वाचे जिवनावश्यक आहेत.

Paachvi Class - सोनिया निरगुडकर

Paachvi Class - आदित्य खुटाळे

आदित्य खुटाळे
Level 5

तुम्हांला कधी खूप ऊन असताना सावली पाहिजे होती का? किंवा आजकाल खूप गर्मी झाली आहे? ह्या सगळ्याचा उपाय झाडे लावणे आहे.

झाडे मस्त मोठे होतात आणि फांद्या पसरतात. म्हणजे तुम्हाला खूप सावली मिळते. आजकाल तापमान वाढले आहे. याचे कारण आहे की खूप प्रदूषण वाढले आहे. याचेपण उपाय झाडे लावणे आहे. झाडे प्रदूषण खातात. घाण हवा आत जाते आणि शुद्ध हवा बाहेर येते.

झाडे लावण्याचे खूप फायदे आहे जसेकी सावली आणि कमी प्रदूषण. तरीपण आपण जास्त झाडे लावण्याऐवजी कापतो. आपण सगळे एकत्र येऊन झाडे लावायला पाहिजे. झाडे लावा, झाडे जगवा.

![HMM Marathi Shala — "Learn Marathi Playfully"]

## ENERGY CORRIDOR BRANCH


माझा आवडता खेळ स्क्रॅबल आहे.
मी स्क्रॅबल माझ्या आई बाबां सोबत खेळतो.
स्क्रॅबल मुळे मी नविन शब्द शिकतो.
आम्ही सुट्टीच्या दिवशी संध्याकाळी स्क्रॅबल खेळतो.
मला खूप मज्जा येते.

निवू मावशी आदित्य गलांडे
11/23/2021

Pahili Class - आदित्य गलांडे


गुलाबजाम - माझा आवडता खाऊ

मला गुलाबजाम खूप आवडतात. मला आवडतात कारण गुलाबजाम गोड, गोल, आणि मऊ असतात. गुलाबजाम सणाच्या दिवसाला करतात. तुम्हाला गुलबजाम करायचे आहे का? मग ही याची कृती. मैदा आणि खव्याचा एकत्र गोळा करा. मग त्याचे छोटे गोळे करा आणि तळा. मग पाक करायला पाणी आणि साखर एकत्र उकळा. आता गुलाबजाम पाकात मुरू द्या. आता रसाळ गुलाबजाम तयार आहेत.

आरुष नवले
वय-११ / वैशाली खांडेकर

Tisari Class -
आरुष नवले

## INNERLOOP BRANCH

माझा आवडता खेळ - सॉकर

माझा आवडता खेळ सॉकर आहे. सॉकर मध्ये २ teams असतात. प्रत्येक team मध्ये ११ खेळाडू असतात. प्रत्येक team मध्ये १ goaly असतात. खेळाडू पायाने बॉल goal मध्ये मारतात. बॉल goal मध्ये गेल्यास team ला point मिळतो. सर्वात जास्त points मिळालेली team जिंकते.

अर्चित नवले

वय-७वर्ष / सारंग बापट



Dusari Class - अर्चित नवले

## KATY BRANCH




Beginner Class
- विहान जोशी

Beginner Class
- ऋग्वेद मिंधे




माझा आवडता खेळ अनिका आठवले पहिली 2
KATY BRANCH
माझा आवडता खेळ मार्शल आर्ट्स आहे.
हा खेळ मला शिस्त शिकवतो आणि
माझं शरीर दणकट बनवतो. ह्या
खेळाचा उपयोग स्वसंरक्षणासाठी पण
होतो. मी मार्शल आर्टसला आठवड्यातून चार वेळा
क्लासला जाते. क्लास मध्ये मी सोमवारी बिगीनर्सना
मार्शल आर्ट्स कसं करायचं हे शिकवते. सध्या मी लो ब्राउन
बेल्ट आहे, पण खूप मेहनत करून मी काळा बेल्ट मिळवणार आहे.
मार्शल आर्ट्स सगळ्यांनी करून पहावं असं मला वाटतं.

Pahili Class -
अनिका आठवले


By स्वरा
11/28/21
माझी भारत भेट
मला भारतात जायला खूप आवडतं. मी भारतात माझ्या आजी आजी, आजोबांकडे रहाते. मी माझ्या भावंडांना भेटते. मी तिथे खूप खरेदी करते. आम्ही नवीन नवीन ठिकाणी सहलीला जातो. मी बाहेरचे खूप सारे पदार्थ खाते. माझी आजी आणि मावशी माझे लाड करतात. मला रिक्षा मध्ये बसायला आणि स्कूटर वर फिरायला आवडते. मी भारतातून परत येताना पुढच्या भारत ट्रीपची खूप वाट पहाते.

Dusari Class -
स्वरा सराफ

आर्ची ठाकुर
वय : ९
इयत्ता तिसरी

## माझा आवडता खेळ

प्रत्येकाचा काही ना काही आवडता खेळ असतो. त्यांना तो खेळ खेळताना आनंद होतो. फिटनेससाठी खेळ आवश्यक आहे. जेव्हा आपण मैदानी खेळ खेळतो तेव्हा ते आपल्याला निरोगी बनवतात.

मी भरपूर खेळ खेळते आणि पहाते. मला सगळ्यात जास्त बॅडमिंटन खेळायला आवडते. साइना नेहवाल आणि पी वी सिंधु हे माझे आवडते खेळाडू आहेत. बॅडमिंटन हा माझा आवडता खेळ आहे, हा एक इनडोअर खेळ आहे पण हा खेळ आपण बाहेरही खेळू शकतो.

बॅडमिंटन हा रॅकेट आणि शटलकॉकसह खेळला जातो. नेटच्या दोन्ही बाजूला उभे राहून हा खेळ खेळतात. हा खेळ दोन-खेळाडू खेळू शकतात. जेव्हा चार खेळाडू एका वेळी खेळतात तेव्हा त्याला डबल्स म्हणतात.

मी माझ्या मोकळ्या वेळेत बॅडमिंटन खेळते. मी माझ्या आई, बाबा, आणि बहिणी बरोबर घरी बॅकयार्ड मध्ये खेळते. मी बॅडमिंटन च्या ट्रेनिंग ला पण जाते. हा खेळ खेळताना मला फ्रेश वाटते, म्हणून कधी अभ्यास करताना कंटाळा आला कि मी बॅकयार्ड मध्ये बॅडमिंटन खेळते. कॉम्पुटर गेम खेळण्यापेक्षा माला बॅडमिंटन खेळायला आवडते. बॅडमिंटन मला निरोगी आणि मजबूत बनवते. आपण सर्वांनी खेळ खेळले पाहिजेत.

Tisari Class - आर्ची ठाकुर

## SUGAR LAND BRANCH

मिहिका पंडित इयत्ता २ शुगरलँड शाळा



भरपूर झाडे का लावावीत?

भरपूर झाडे लावल्याने सगळीकडे हिरवेगार दिसते. ते बघुन आपल्याला खूप छान वाटते. झाडांपासून आपल्याला अन्न, घर, कपडे आणि बऱ्याच उपयोगी गोष्टी मिळतात. पक्ष्यांना झाडांवर घरटी बनवुन रहायला मिळते आणि प्राण्यांना

१/३




खायला आणि बसायला सावली मिळते. झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साईड वापरून ऑक्सिजन परत सोडतात, जो आपल्या सर्वांना आवश्यक आहे. भरपूर झाडे लावल्याने आपल्याला शुद्ध हवा मिळते. झाडांची मुळे जमिनीतले पाणी शोखून

जमिनीची झीज कमी करतात.

आमच्या बागेत आम्ही खूप झाडे लावली आहेत. मी त्यांना पाणी घालते आणि त्यांची काळजी घेते.

आपण सर्वांनी भरपूर झाडे लावूया आणि पृथ्वी अधिक सुंदर बनवू या!!!



३/३

Dusari Class - मिहिका पंडित

रमा घाणेकर    इयत्ता : दुसरी    १२/०५/

शुगरलॅंड शाळा

माझा आवडता खाऊ

माझा आवडता खाऊ शिरा आहे.
शिरा गोड असतो.
शिऱ्या करण्या साठी आई रवा,
साखर, दुध, तूप, आणी पाणी
वापरते. शिरा झाल्या वर आई
शिऱ्या वर काजू, बदाम आणी
पिस्ते टाकते, व केशर टाकते.
मी केव्हाही, कधीही, कुठेही शिरा
खाऊ शकते॥.

Dusari Class - रमा घाणेकर


कार्यक्रम समाप्त,
विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!